नविन निवृत्तीवेतन आज्ञावलीची
अंमलबजावणी करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः संकिर्ण १०१० / प्र क्र १७ / भाग ५ / कोषा प्र ५**
मंत्रालय मुंबई-४०००३२
तारीख: ०७ ऑगस्ट, २०१३

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०१०/प्र.क्र.१७/भाग-५/कोषा-प्र-५, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१२

**शासन शुध्दीपत्रक :-**

उपरोक्त संदर्भाकिंत शासन निर्णयान्वये नवीन निवृत्ती वेतन आज्ञावलीची अंमलबजावणी करणेबाबतची प्रक्रिया नमूद केलेली आहे. सदर शासन निर्णयात परिच्छेद क्रमांक १० मध्ये नमूद केलेल्या मसुदयात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. तरी यापुढे सदर शासन शुद्धीपत्रकाच्या दिनांकापासुन खालीलप्रमाणे कार्यपद्धती अमलात आणावी.

"कोणत्याही परिस्थितीत सर्व निवृत्तीवेतनाचे मासिक देयक तयार झाल्याशिवाय उपकोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) /सहायक अधिदान व लेखा अधिकारी (निवृत्तीवेतन) यांनी कोषागारातील लेखा परिक्षा शाखेकडे पाठवू नये. तसेच लेखा परिक्षा शाखेने सर्व देयकांपैकी काही देयके आक्षेपित किंवा पारित करु नये. सर्वच देयके योग्य असतील तरच ती पारित करावी. अथवा एक किंवा अधिक देयके आक्षेपित असतील तर सर्व देयके परत करावीत."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०८०७१६१५२६९८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anant Mahadev Jadhav

Digitally signed by Anant Mahadev Jadhav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Anant Mahadev Jadhav
Date: 2013.08.07 16:22:38 +05'30'

**(अ.म.जाधव)**
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

५. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यासनांचे प्रमुख
६. प्रबंधक, मुळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
११. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१२. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१५. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१६. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१७. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
१८. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२०. सर्व विभागीय आयुक्त
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२३. संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
२४. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
२५. सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती
२६. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
२७. सहसंचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती
२८. वित्त विभागातील सर्व कार्यासने
२९. निवड नस्ती कोषा प्र.५